**माहिती व तंत्रज्ञान विभाग**

दि. २५.१०.२०१७

**परिपत्रक**

**(अत्यंत महत्त्वाचे / तातडीचे)**

**विषय** : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये ई-निविदा (e-Tendering) प्रक्रिया राबविण्याकरिता, NIC कडील महाराष्ट्र शासनाची शासकीय ई-निविदा प्रणाली कार्यान्वित करणेबाबत...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सध्या कार्यरत असलेल्या ई-निविदा प्रणाली ऐवजी NIC यांचेकडील ई-निविदा संगणक प्रणालीचा वापर करणेबाबतचे प्रस्तावास मा. आयुक्त सो. यांनी दि. २३.१०.२०१७ रोजी मान्यता दिलेली आहे. या संदर्भात NIC यांचेकडील अधिकारी वर्गाशी विविध स्तरावर बैठका करून सदर प्रणाली, महानगरपालिकेत कार्यान्वित करणेबाबतची तयारी अंतिम टप्प्यात आली असून सदर प्रणाली हाताळणी बाबतचे कर्मचारी, अधिकारी व कंत्राटदारांना द्यावयाचे प्रशिक्षण लवकरच आयोजित करण्यात येणार आहे.

**सद्यस्थितीतील मनपाची ई-निविदा प्रणाली :-**

सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कार्यान्वित असलेली ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात येत असून मनपाच्या विविध विभागांमार्फत भांडवली व महसूली स्वरूपाच्या निविदा मागविणेत येतात. तसेच एकूण पाच प्रकारच्या ( Lump sum/Item wise, Percentage, Medicine, Vehicle व No rate) इत्यादी निविदा प्रकारानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून सर्व मान्यतेअंती महसूली निविदांकरीता विभागामधील कर्मचा-यांमार्फत निविदा काढण्यासाठी निविदा फॉर्म, निविदा प्रसिध्दी मसूदा तयार करून मनपाच्या संकेतस्थळावर व रोटेशननुसार वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात येते. तद् नंतर ई-निविदा प्रणालीमध्ये ठेकेदारांना निविदा भरण्यासाठी अपलोड करण्यात येते. तसेच भांडवली स्वरूपाच्या निविदांकरीता मनपाच्या Dash Board संगणक प्रणालीद्वारे निविदा प्रसिध्दी व ई-निविदा संगणक प्रणालीमध्ये निविदा ठेकेदारांना भरण्यासाठी Upload करणे इत्यादी कामे Dash Board प्रणालीद्वारे त्यांच्या स्वतःच्या Login द्वारे Process करण्याची सुविधा उपलब्ध करून देणेत आलेली आहे. तसेच ठेकेदारांना निविदा सादर करताना त्यांच्या दरांसोबत निविदेसाठी आवश्यक असलेली कागदपत्र Upload करण्याची सुविधा संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध आहे. त्यानंतर निविदेच्या दिलेल्या मुदती अंती, नेमून दिलेल्या अधिकाऱ्यांच्या कमिटी समोर नामनिर्देशित अधिका-यांच्या Digital स्वाक्षरीने, उपलब्ध कंत्राटदारां समक्ष निविदा उघडण्यात येतात. आलेल्या निविदांच्या अनुषंगाने विविध तांत्रिक अहवाल तयार करण्यात येतात व त्या नंतर सादर केलेल्या कागद पत्रांची पडताळणी करून पात्र कंत्राटदारांचा आर्थिक दरपत्रक उघडण्याची प्रक्रीया निविदा समितीसमोर करण्यात येते. सदरचे कामकाज करताना निविदा आर्थिक दरपत्रक उघडल्यानंतर ठेकेदारांनी निविदासोबत Online सादर केलेली EMD व PSD ही L1 व L2 निविदाधारकांव्यतिरिक्त उर्वरीत निविदाधारकांच्या EMD व PSD ची रक्कम ज्या खात्यामधून महापालिकेस प्राप्त झालेली आहे त्या खात्यांमध्ये Automated पध्दतीने मानवी हस्तक्षेप न होता जमा होतील याची सुविधा मनपाच्या ई-निविदा संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध करून देणेत आलेली आहे.

**या सर्व प्रक्रियेत मुख्यत्वे** - निविदा प्रपत्र तयार करणे, निविदेच्या अटी व शर्थीनुसार त्याचा प्रणालीसाठी योग्य असा Format तयार करणे, कंत्राटदारांना बोली भरण्यासाठी (Price Bid) Format तयार करणे, निविदेची मुदत ठरवणे, निविदेच्या प्रतिसादानुसार मुदतवाढ देणे अथवा अटी व शर्थीमध्ये बदल करून योग्य मान्यतेनंतर पुनः प्रसिद्ध करणे, मुदती अंती नेमून दिलेल्या अधिकाऱ्यांच्या समोर नामनिर्देशित अधिकारी कमिटीच्या Digital स्वाक्षरीने निविदा उघडणे, सादर केलेल्या निविदांच्या अनुषंगाने विविध तांत्रिक अहवाल तयार करणे, सादर केलेल्या कागद पत्रांची पडताळणी करणे, पात्र कंत्राटदारांचा आर्थिक दरपत्रक उघडणे, लघुत्तम निविदाकाराचा अहवाल तयार करणे, अशी विविध कामे विभागामार्फत केली जातात. त्याचबरोबर कंत्राटदारांची ई-निविदा प्रणाली मध्ये नोंदणी करणे त्यांना वेळोवेळी लागणारे सहाय्य इत्यादी कामे विविध विभागांमार्फत करण्यात येतात.

**प्रस्तावित ई-निविदा प्रणाली व कार्यपद्धती :-**

NIC यांचेकडील ई-निविदा प्रणाली ही महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेली असून https://mahatenders.gov.in या संकेत स्थळाद्वारे सर्वांना वापरण्यास उपलब्ध आहे. ही प्रणाली शासकीय संस्थांना तसेच कंत्राटदारांना मोफत वापरता येणार असून कंत्राटदाराने सुरुवातीस एकदा स्वतःची निःशुल्क नोंदणी करून सदर प्रणालीद्वारे Login ID व Password मिळवणे क्रमःप्राप्त आहे. त्यानंतर त्यांना Advance Search मधून 'पिंपरी चिंचवड महानगरपालिका' निवडून त्याद्वारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत प्रसिद्ध करण्यात आलेली कोणतीही उपलब्ध निविदा भरण्यासाठी पुढील योग्य ती प्रक्रिया करावी लागणार आहे.

मा. आयुक्त सो. यांचे निर्देशानुसार, महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागाने विभागांतर्गत, स्वतःच्या अधिपत्याखाली NIC यांचेकडील ई-निविदा प्रणाली वापरावयाची असून त्यासाठी NIC मार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागासाठी एक Login ID व Password देण्यात येणार आहे. ही प्रणाली हाताळताना विभागातील निवडक कर्मचारी व अधिकारी यांना विविध पातळीवर काम करण्यासाठी (उदा. Admin-Nodal Officer, Admin-HOD, Publisher, Opener, Evaluator) हक्क (Rights) देण्यात येणार आहेत. तसेच त्यांना NIC मार्फत प्राथमिक प्रशिक्षण देण्यात येणार असून त्यासाठी प्रत्येक विभागाने आपाआपले योग्य प्रतिनिधी निवडून त्यांना ह्या प्रशिक्षणात सहभागी करून घेणे क्रमःप्राप्त राहणार आहे. या प्रशिक्षणाची दिनांक व वेळ लवकरच कळविणेत येईल. NIC मार्फत फक्त सुरुवातीच्या काळातच (ई-निविदा प्रणाली online होईपर्यंत) सदरची मदत मिळणार असल्याने त्यानंतर उपरोक्त नमूद केलेली निविदा प्रक्रियेबाबतची सर्व कामे ही महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागातील प्रशिक्षित कर्मचारी व अधिकारी यांचेकडूनच करून घेणे आवश्यक रहाणार आहे. कामाचा एकूण व्याप व गरज लक्षात घेऊन या प्रणालीसाठी सर्व विभागांनी कर्मचारी /अधिकारी यांची विभागांतर्गत नियुक्ती करणे योग्य ठरणार आहे.

या प्रक्रियेसाठी विविध विभागांना Authorised Signatory म्हणून लागणारी Digital Signature Dongle (Class-II/III, Signing & Encryption) माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत पुरविण्यात येणार असून ही Signature वैयक्तिक नावानेच उपलब्ध होत असतात. त्यामुळे प्रत्येक विभागातील संबंधित कर्मचारी / अधिकारी यांनी माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क करून, त्याकरिता लागणारी कागदपत्रे सादर करून सदरची Digital Signature उपलब्ध करून घ्यावी. प्रत्येक विभागाकडे कमीत कमी दोन अधिकाऱ्यांच्या नावे Digital Signature असणे क्रमःप्राप्त राहणार आहे असे NIC यांचेमार्फत कळविण्यात आलेले आहे. या Digital Signature शिवाय NIC यांचेकडील ई-निविदा प्रणालीवर कोणतीही निविदा प्रक्रिया राबविता येणार नाही याची प्रत्येक विभागाने नोंद घ्यावी. तसेच ठेकेदारांनी सदरची प्रणाली वापरण्यासाठी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर एकदा विनामोबदला Online नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे महापालिकेच्या कोणत्याही विभागात Vendor Registration करण्याची आवश्यकता भासणार नाही. तसेच सदर Portal द्वारे निविदा भरण्यासाठी कोणत्याही Digital Key Provider यांची (Class-II/III, Signing & Encryption) Digital Key संबंधित ठेकेदारांना खरेदी करावी लागणार आहे अथवा त्यांचेकडे उपलब्ध असल्यास सदरची Key त्यांना वापरता येईल. नंतरच्या काळात कोणत्याही प्रकारच्या मदतीची आवश्यकता असल्यास नियुक्त कर्मचारी / अधिकारी यांनी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करून अथवा आपल्यासाठी NIC ने नियुक्त केलेल्या अधिका-याशी संपर्क साधून मदत मिळवता येणार आहे. अशाप्रकारे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे निविदा प्रपत्र तयार करून, प्रसिद्धी व त्यापुढील योग्य ती सर्व कार्यवाही करून, कंत्राटदार निवडीची संपूर्ण प्रक्रिया ही प्रत्येक विभागामार्फत त्यांच्या स्तरावर राबवावयाची आहे. सद्यस्थितीत ज्या विभागांकडील निविदा प्रसिध्दी, निविदा मागविणेचे कामकाज मध्यवर्ती भांडार विभागामार्फत करण्यात येते त्या विभागांनी त्यांचेकडील निविदाबाबतचे कामकाज यापुढे देखील मध्यवर्ती भांडार विभाग (Tender Cell) यांचेमार्फत करून घ्यावयाचे आहे. तसेच मध्यवर्ती भांडार विभाग हा यापुढे Tender Cell म्हणून कामकाज करेल. निविदा विषयक कामकाजासाठी NIC यांचेकडील ई-निविदा प्रणाली योग्य प्रकारे कार्यान्वित झाल्यानंतर, सद्यस्थितीत वापरात असलेली मनपाची ई-निविदा प्रणाली बंद करणेत येणार आहे.

सबब, सदर NIC यांचेकडील ई-निविदा प्रणाली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत राबविणेसाठी प्रत्येक विभागाने आपल्या स्तरावर प्रतिनिधींची नेमणूक करून, यासाठी प्रशिक्षणास हजर राहण्यासंबंधी व यापुढील निविदेच्या सर्व प्रक्रिया त्यांचे मार्फत होणे संबंधीचे कामकाज पुर्ण करावे

**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८**

**प्रति,**
**सर्व विभाग प्रमुख**

**क्र. मातं/६/कावि/६९२/२०१७**
**दिनांक २७ /११ /२०१७**